RNI No. MAHBIL /2009/31733
Reg. No. MH/MR/South-322/2013-15

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—अ

वर्ष ५, अंक १०८] गुरुवार, मार्च ६, २०१४/फाल्गुन १५, शके १९३५ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १५.००

### असाधारण क्रमांक ४५

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

### सामान्य प्रशासन विभाग

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २४ फेब्रुवारी २०१४

### अधिसूचना

**भारताचे संविधान.**

क्रमांक वशिअ. १११३/प्र.क्र. ७३/११.—भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहेत :—

१. या नियमांना महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) (सुधारणा) नियम, २०१४ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ च्या नियम ३ मध्ये,—

(अ) पोट-नियम (१) च्या शेवटी पुढील स्पष्टीकरण समाविष्ट करण्यात यावे :—

"**स्पष्टीकरण.**—शासकीय कर्मचारी वारंवार त्याला नेमून दिलेले काम त्यासाठी विहित केलेल्या कालमर्यादेत आणि त्याच्याकडून अपेक्षित असलेल्या दर्जानुरूप पूर्ण करीत नसेल तर ती वरील पोट-नियम (१) मधील खंड (दोन) च्या अर्थांतर्गत कर्तव्यपरायणतेमधील उणीव मानली जाईल."

(ब) पोट-नियम (३) च्या जागी खालील पोट-नियम समाविष्ट करण्यात यावा :—

"(३) (एक) कोणताही शासकीय कर्मचारी त्याच्या कार्यालयीन वरिष्ठाच्या निदेशानुसार कृती करीत असेल ते खेरीजकरून, त्याच्या कार्यालयीन कर्तव्याचे पालन करीत असताना किंवा त्याला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करताना त्याच्या सत्सद्विवेकबुद्धीनुसार सत्य व अचूक नसलेल्या गोष्टी करणार नाही,

(दोन) कार्यालयीन वरिष्ठाचे निदेश सामान्यतः लिखित स्वरूपात असतील. मौखिक निदेश देण्याचे, शक्य असेल तेथवर, टाळले जाईल. मौखिक निदेश देणे अपरिहार्य असेल तेव्हा कार्यालयीन वरिष्ठ त्यास त्यानंतर तात्काळ लिखित पुष्टी देईल,

(तीन) शासकीय कर्मचारी, त्याला त्याच्या कार्यालयीन वरिष्ठांकडून मौखिक निदेश मिळाल्यानंतर शक्य तेवढ्या लवकर त्यास लेखी पुष्टी मिळविल आणि अशा प्रकरणी निदेशाची लेखी पुष्टी देणे हे कार्यालयीन वरिष्ठाचे कर्तव्य असेल.''.

सदर शासन अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या *www.maharashtra.gov.in* या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली असून अधिसूचनेचा संकेतांक २०१४०२२४१४४२५३४१०७ असा आहे. ही अधिसूचना डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**पां. जो. जाधव,**
शासनाचे उप सचिव.

## GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya
Mumbai 400 032, dated the 24th February 2014.

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No. VASHIA. 1113/C.R. 73/11.—In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the Following rules further to amend the Maharashtra Civil Services (Conduct) Rules, 1979, namely :—

1. These rules may be called the maharashtra Civil Services (Conduct) (amendment) Rules, 2014.

2. In rule 3 of the Maharashtra Civil Services (Conduct) Rules, 1979,—

(*a*) in sub-rule (1), at the end, the following explanation shall be added, namely :—

"*Explanation*.—A Government servant who habitually fails to perform the task assigned to him within the time set for the purpose and with the quality of performance expected of him shall be deemed to be lacking in devotion to duty within the meaning of clause (*ii*) of sub-rule (1)."

(*b*) for sub-rule (3), the following sub-rule shall be substituted, namely :—

"(3) (*i*) No Government servant shall, in the performance of his official duties, or in the exercise of powers conferred on him, act otherwise than in his own best judgement to be true and correct except when he is acting under the direction of his official superior ;

(*ii*) The direction of the official superior shall ordinarily be in writing. Oral direction to subordinates shall be avoided, as far as possible. Where the issue of oral direction becomes unavoidable, the official superior shall confirm it in writing immediately thereafter ;

(*iii*) A Government servant who has received oral direction from his official superior shall seek confirmation of the same in writing, as early as possible and in such case, it shall be the duty of the official superior to confirm the direction in writing."

This notification of Maharashtra Government is available at the website *www.maharashtra.gov.in*. Notification No. for this is 201402241442534107. This notification has been signed digitally.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

P. J. JADHAV,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.